**भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम-२०१३ अंतर्गत कलम २१ अन्वये कलम २१ (१) (४) खालील नोटीस**

---

क्र.उ.जि./भू.सं./मुं.श./मुं.मे.ला.३/प्र.क्र.-२/२५०/२०१८
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मुंबई शहर,
डी. डी. बिल्डिंग, पहिला मजला,जुने जकात घर, फोर्ट,
मुंबई ४०० ००१
दिनांक :- ०४/०५/२०१९

प्रति,
M/s. Favorable Real Developers Pvt. Ltd.
593, 5th Floor Chhugomal Building
J.S.S. Road Chira Bazar.
Mumbai. 400 002

भूमी संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत कलम १९ ची अधिसूचना क्र. जि/भूसं/मु.श/प्र.क्र.२/एलएक्यू/एसआर-२०१८ दिनांक २५ मार्च २०१९ रोजीचे महाराष्ट्र शासन राजपत्र भाग एक-कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, एप्रिल ४-१०,२०१९ पृष्ठ क्र. २२,२३,२४ व २५ मध्ये मराठी व इंग्रजी मध्ये प्रसिध्द करणेत आली आहे. मूळ अधिसुचना राजपत्र व दैनिक वर्तमानपत्रातील प्रसिध्दीचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | महाराष्ट्र शासन राजपत्र | भाग एक- कोकण विभागीय पुरवणी, गुरुवार ते बुधवार, एप्रिल ४-१०,२०१९ पृष्ठ क्र. २२,२३,२४, व २५ |
| २ | दैनिक वर्तमानपत्र | |
| | अ) महाराष्ट्र टाइम्स | दिनांक ३१ मार्च २०१९ |
| | ब) टाइम्स ऑफ इंडिया | दिनांक ३१ मार्च २०१९ |

उक्त अधिसुचनेतील अनुसुचिमध्ये भुकर क्रमांक ९५६,विभाग-भुलेश्वर क्षेत्रफळ ११९.५७ चौ.मी. मुंबई मेट्रो लाईन-३ प्रकल्पाच्या बांधकामासाठी शासनाने ताब्यात घेण्याचे ठरविले आहे.

E:\MMRCL Land Acq\C.S.No. 956\Tenants Notice Sce.21.docx

Scanned by CamScanner

आपले या भूमीमध्ये किंवा भूमीवर कोणतेही हितसंबंध किंवा अधिकार असल्यास किंवा आपण अशारीतीने हिसंबंधित असलेल्या व्यक्तीसाठी काम चालविण्यास हक्कदार असल्यास, आपणास याव्दारे या भूमीत हितसंबंधित असलेल्या सर्व व्यक्तींना, भूमीमधील त्यांच्या हितसंबंधाचे स्वरुप आणि त्यासंबंधातील भरपाईवर सांगितल्या जाणाऱ्या त्यांच्या दाव्याची रक्कम व तपशील आणि अधिनियमाच्या कलम २० अनुसार केलेल्या मोजणीसंबंधी कोणत्याही असल्यास, त्याच्या आक्षेपांसह पुनर्वसन व पुर्नवसाहतीसाठीचे दावे (हक्क मागण्या) यासह निम्नस्वाक्षरीत यांचे दालनात दिनांक १५/०५/२०१९ रोजी सकाळी ११.३० वाजता सुनावणी निश्चित करण्यात आली आहे. त्यावेळी आपले म्हणणे लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रे/पुराव्यासह सादर करावीत.

| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | भूकर क्रमांक | विभाग | संपादन करावयाचे जमिनीचे क्षेत्रफळ (चौ.मी.) | संपादनाचे प्रयोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ९५६ | भुलेश्वर | ११९.५७ | मुंबई मेट्रो लाईन-३ |

**ठिकाण :-** मुंबई
**दिनांक :-** 08/05/2019

**सुषमा सातपुते,**
**उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),**
**मुंबई शहर**

प्रत:-

१) मा.अपर जिल्हाधिकारी तथा महाव्यवस्थापक (भूमी),नामट्री बिल्डिंग, प्लॉट नं- १३ ब्लॉक बि.के.सी. बांद्रा पुर्व मुंबई-४०० ०५१
आपले कार्यालयाचे बोर्डावर व संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा ही विनंती

२) अधिक्षक, नगर भूमापन व भूमी अभिलेख मुंबई शहर
मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या कार्यालयाचे नोटीस बोर्डवर सदर नोटीस प्रसिध्द करणेत यावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा ही विनंती

३) जिल्हा सूचना व विज्ञान अधिकारी, (NIC), मुंबई शहर
मा.जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत यावी व अहवाल या कार्यालयास सादर करावा.



Scanned by CamScanner